सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन


## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४६१४२०)


जा.क्र.: विससं/उशि/कोविप/मवि/२०२१/२६६० दि.१६.१२.२०२१

प्रति,
प्राचार्य / शैक्षणिक संस्था प्रमुख,
अधिनस्त कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक व शारिरीक शिक्षण शास्त्र महाविद्यालये,
जिल्हा - ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

**विषयः महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांकरीता प्रोत्साहित करण्यासाठी राज्य स्तरावर घेण्यात येणाऱ्या राज्य सामाईक प्रवेश पूर्व परीक्षा २०२२ करीता प्रोत्साहित करणेबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व प्राचार्य तसेच स्पर्धा परीक्षा समन्वयक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यामध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांचा केंद्र शासन तसेच राज्य शासनाच्या सेवेत महाराष्ट्रीयन विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविण्याकरीता राज्य सामाईक प्रवेश पूर्व परीक्षा २०२२ या परीक्षेचे आयोजन महाराष्ट्र शासनातर्फे करण्यात आले असून त्याबाबतचे वेळापत्रक सोबत जोडले आहे. यापूर्वी प्रत्येक महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समन्वयकाची नियुक्ती करण्यात आली असून विद्यार्थ्यांना त्यांच्याव्दारे विविध स्पर्धा परीक्षांचे तसेच करिअर कटटा या उपक्रमाचे वेळोवेळी आभासी पध्दतीने मार्गदर्शन केले जाते. राज्य शासनाच्या विद्यार्थी केंद्रीत उपक्रमांतर्गत ५६० विद्यार्थ्यांची निवड शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग संचलित राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्था (SIAC) मार्फत सामाईक प्रवेश पूर्व परीक्षा २०२२ चे आयोजन केले आहे, याची माहिती व प्रसिध्दी सर्व पात्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा समन्वयक तसेच प्राचार्य यांची राहील.

त्यानुसार उपरोक्तप्रमाणे सर्व महाविद्यालयांतील स्पर्धा परीक्षा समन्वयक व प्राचार्य यांनी सर्व पात्र संबंधित विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी. तसेच सोबत जोडलेल्या मसुद्याप्रमाणे तात्काळ बॅनर तयार करुन महाविद्यालयाच्या प्रवेशव्दाराच्या दर्शनी भागावर लावण्यात यावा.

**टिपः उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा प्रस्तूत कार्यालयामार्फत दि.१७.१२.२०२१ रोजी आयोजित केलेल्या शिष्यवृत्त्यांच्या आढावा बैठकीत केली जाणार आहे. तरी सदर बैठकीस प्राचार्यांसह स्पर्धा परीक्षा समन्वयक यांनीही सहभागी व्हावे.**

(डॉ. संजय जगताप)
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रतः
मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.



मा.श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा.श्री.अजित पवार
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा.श्री.बाळासाहेब थोरात
महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य



मा.श्री. उदय सामंत
उच्च व तंत्र शिक्षणमंत्री
महाराष्ट्र राज्य

# महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

## राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्था (SIAC)

**हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्स समोर, मुंबई - ४०० ००१**

---

**सामायिक प्रवेश परीक्षा - २०२२**

**UPSC - नागरी सेवा परीक्षा ( IAS / IFS / IPS ) २०२२ च्या तयारीसाठी परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम - २०२२**

**महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा UPSC - नागरी सेवा परीक्षेत यशस्वी होण्याचा टक्का वाढवा याकरिता पूर्व प्रशिक्षण प्रवेश परीक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा.**

**केंद्रीय सेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२२ च्या पूर्व प्रशिक्षणाकरिता पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबईसह भारतीय प्रशासकीय पूर्व प्रशिक्षण केंद्र नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक आणि कोल्हापूर केंद्रातील प्रशिक्षण प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. याकरिता इच्छुक पात्र उमेदवारांकडून online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**शैक्षणिक पात्रता : -**

**उमेदवार हा कोणत्याही मान्यता पात्र विद्यापीठाचा पदवीधर असावा किंवा जो उमेदवार पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या सत्र (semester) परीक्षेला बसलेला आहे आणि ज्यांचे निकाल प्रलंबित आहेत (अशा उमेदवारांनी प्रवेशाच्या वेळीस ट्रान्सफर सर्टिफिकेट देणे बंधनकारक राहील). प्रवेशीत विद्यार्थ्यांना अद्यावत अभ्यासिका, पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण वसतिगृहाची सुविधा व मासिक विद्यावेतन शासन निर्णयानुसार व शासनाने वेळोवेळी केलेल्या सूचनांनुसार देण्यात येईल.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | ऑनलाइन अर्ज भरण्याची सुरुवात | दि. ०९/१२/२०२१ | गुरुवार | सकाळी १०.०० पासून |
| २. | अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दि. ०७/०१/२०२२ | शुक्रवार | रात्रौ. १२ वा.पर्यंत |
| ३. | फी भरण्याचा अंतिम दिनांक | दि. ०९/०१/२०२२ | रविवार | सायं. ५ वा.पर्यंत |
| ४. | अभिरुप (Mock) चाचणी | दि. १२/०१/२०२२ | बुधवार | सकाळी ११ ते दुपारी १ वा.पर्यंत |
| ५. | सामायिक ऑनलाइन प्रवेश परीक्षा | दि. १६/०१/२०२२ | रविवार | सकाळी ११ ते दुपारी १ वा.पर्यंत |
| ६. | परीक्षा निकाल | दि. २०/०१/२०२२ | गुरुवार | सायं. ५.०० वाजता |

उमेदवारांना ऑनलाइन परीक्षेचे (२०० गुण) व मुलाखतीचे (५० गुण) मिळवून मिळणाऱ्या गुणांच्या आधारे प्रवेश दिला जाईल व मुलाखतीची तारीख व वेळ ऑनलाइन परीक्षेनंतर कळविण्यात येईल.

**दूरध्वनी क्रमांकः ०२२-२२०७०९४२/२२०६१०७१ Email Id - siac1915@gmail.com**

सविस्तर जाहिरात, परीक्षेचा अभ्यासक्रम आणि पात्रता, online अर्ज भरण्याविषयी सूचना व इतर माहिती www.siac.org.in किंवा www.siacexam.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.